।। विद्या अमृतम अश्नुते ।।
सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचलचे
**श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल-रायपाटण**
पत्ता :- मु.पो.रायपाटण,ता.राजापूर,जि.रत्नागिरी -४१६७०४
email :- mhkcollegepachal@gmail.com
Web : www.khapnecolleg.com ● Phone No. (02353) 299181

News Bulletin
(खाजगी वितरणासाठी)

# संवाद

७ फेब्रुवारी २०२५

वर्ष - १२ वे
अंक - १३ वा

- संपादक -
प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम

- कार्यकारी संपादक -
प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील

## नॅक पुनर्मूल्यांकनात खापणे महाविद्यालयास 'ब 'श्रेणी






येथील श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयाचे नॅक पुनर्मूल्यांकन 27 व 28 सप्टेंबर 2024 रोजी पूर्ण झाले. या मूल्यांकनासाठी मंगलुरु विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पी. सुब्रमण्यम येडापडीथया, उत्तर प्रदेशातील दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठ गोरखपूरचे प्रोफेसर डॉ.अजय गुप्ता, तामिळनाडूच्या एच एच राजेश कॉलेजचे प्राचार्य डॉ. थिरूसेलवम चिन्नईय्यान या कमिटीने काम पाहिले. महाविद्यालयाच्या या नॅक पुनर्मूल्यांकनासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणेसाहेब, उपाध्यक्ष श्री.शंकरराव चव्हाण, सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर, सर्व संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए. येल्लुरे, आय. क्यू.ए.सी. प्रमुख प्रा. एस. व्ही.निंबाळकर, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, सर्व आजी माजी विद्यार्थी,पालक, संस्थेचे सभासद व हितचिंतक या सर्वांचे सहकार्य लाभले.

### खापणे महाविद्यालयाच्या शुभम गोरुलेची राज्यस्तरीय आव्हान शिबिरात यशस्वी घोडदौड



श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा विद्यार्थी शुभम गोरुले याची अमरावती येथे होणाऱ्या आव्हान शिबिरासाठी निवड झाली होती. या शिबिरात एनडीआरएफचे जवान आपत्ती व्यवस्थापना संदर्भात प्रशिक्षण व माहिती देतात. दिनांक 7 नोव्हेंबर ते 16 नोव्हेंबर 2024 या कालावधीत अमरावतीत संपन्न झालेल्या या शिबिरात शुभम गोरुले याने यशस्वीरित्या आपला सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे नाव राज्यस्तरावर नेण्याचे काम केले. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणे, संस्थेचे सरचिटणीस श्री.नरेश पाचलकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

### येरडव ते अनुस्कुरा या मार्गावरील ऐतिहासिक पायवाटेची खापणे महाविद्यालयाने केली दुरुस्ती - राज्यपातळीवर घेतली गेली दखल



खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने निवासी शिबिरात केलेल्या येरडव ते उगवाई मंदिर (अनुस्कुरा घाट) या ऐतिहासिक पायवाटेच्या दुरुस्तीची दखल दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्राने घेतली. त्यानंतर पुरातत्त्व विभागाने या गोष्टीची दखल घेतली असून येथील ऐतिहासिक शिलालेख, पांडवकालीन उगवाई मंदिर व येथील कात्याळातील झरा यांच्या संशोधनासाठी व संरक्षणासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. प्रशासकीय पातळीवर या पायवाटेच्या दुरुस्तीसाठी व पर्यटनाला चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राजापूर तालुका पत्रकार संघ यासाठी पाठपुरावा करत आहे.

## "वाढत्या तापमान वाढीवर वृक्षारोपण हेच औषध" श्री मनोहरजी खापणे



वाढत्या तापमान वाढीवर वृक्षारोपण हेच औषध असून आत्ता आपण वृक्षारोपण केले पाहिजे. वड, पिंपळासारख्या देशी आणि दीर्घायुष्य असणाऱ्या वृक्षांची लागवड केल्यास प्रदूषण आणि तापमानाला आळा बसेल. वाढती जमिनीची धूप थांबेल. जमिनीची पाणी धारण क्षमता वाढेल. म्हणूनच सर्वांनी वृक्षारोपणाचा ध्यास घेऊन देशी वृक्षांची लागवड करू या", असे आवाहन सह्याद्री परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणे यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित ' जागतिक पर्यावरण दिन' कार्यक्रमात वृक्षारोपण प्रसंगी बोलत होते. यावेळी संस्थेचे माजी सरचिटणीस श्री. नारायण पांचाळ, माजी ओएस श्री. नरेश पाचलकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए.येलुरे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ.विकास पाटील,प्रा. मुग्धा देवरुखकर, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी दहा वड आणि पाच पिंपळ, पाच नारळ अशा वृक्षांचे वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## खापणे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रस्त्यावरील झाड हटवून रस्ता केला वाहतुकीस मोकळा

आज सकाळी पाचल हरळ रस्त्यावर झाड पडल्याने वाहतूक कोंडी झाली होती. येथील श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी हे रस्त्यावरील झाड हटवण्यासाठी सकाळीच प्रयत्न सुरू केले. विद्यार्थ्यांनी प्रथमतः झाड एका बाजूला खेचत एका बाजूने रस्ता सुरू केला. त्यानंतर रस्त्यावर पडलेले झाडाचे खोड तोडून ते एका बाजूला टाकून रस्ता वाहतुकीस मोकळा केला. यामध्ये कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास पाटील, प्रा.पी.पी. राठोड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या या कामाचे कौतुक परिसरातील वाहन धारकांकडून व नागरिकांतून होत आहे.

## खापणे महाविद्यालयामार्फत जुन्या कागदांपासून नव्या वह्या बनवून वाटप

श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत जुन्या वह्यातील उर्वरित कागद संकलित करून त्याच्या नवीन वह्या बनवून त्या रायपाटण हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना वाटण्यात आल्या.

## "महाविद्यालयाच्या वाटचालीत पालक आणि आजी-माजी विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची" श्री चंद्रकांतजी लिंगायत

"महाविद्यालयाच्या प्रगतीत संस्थेबरोबरच पालक आणि आजी-माजी विद्यार्थी यांची भूमिका महत्त्वाची असते. आज महाविद्यालयाचा तिसावा वर्धापन दिन साजरा करत असताना या महाविद्यालयाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सर्व मान्यवरांचे स्मरण करूया. संस्थेचे अध्यक्ष श्री मनोहरजी खापणेसाहेब यांचे महाविद्यालयाच्या विकासासाठीचे प्रयत्न यशस्वी करूया. येऊ घातलेल्या नॅकला सामोरे जाताना संस्था, कर्मचाऱ्यांबरोबरच पालक व आजी-माजी विद्यार्थी यांची भूमिका महत्त्वाची असून यासाठी आपण सर्वांनी संघटित प्रयत्न करूया ",असे आवाहन संस्थेचे सरचिटणीस श्री. चंद्रकांतजी लिंगायत यांनी केले ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात महाविद्यालयाचा ' तिसावा वर्धापन दिन,पालक व माजी विद्यार्थी मेळावा' या संयुक्त कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सदस्य श्री. सिद्धार्थ जाधव, सीडीसी समितीचे सदस्य श्री. खुशीराम मोरे, संस्थेचे माजी सरचिटणीस श्री. नारायण पांचाळ, माजी ओएस श्री. नरेश पाचलकर, परुळेचे उपसरपंच श्री संतोष सावंत, परुळेचे पोलीस पाटील श्री. सुनिल कस्पले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या 'सह्यागिरी' या वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थी श्री.कुणाल गांगण,कोळम हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.प्रकाश शेलार, डॉ.ए.डी. पाटील , प्रा. एस. व्ही. निंबाळकर , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए. येलुरे .संस्थेचे माजी सरचिटणीस श्री. नारायण पांचाळ,संस्था सदस्य श्री. सिद्धार्थ जाधवसर आदी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## तरुणाईने महसूल विभागाच्या योजनांचा लाभ घेऊन त्या समाजापर्यंत पोहोचवण्याची गरज " नायब तहसीलदार सौ. शेळके



"महाराष्ट्र शासन महसूल विभागाने 'महसूल पंधरवडा ' कार्यक्रम आयोजित केला असून या अंतर्गत 'युवा संवाद' हा उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी लागणाऱ्या उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला, नॉन क्रिमिलियर दाखला यासारख्या विविध कागदपत्रांसाठी तहसील दरबारी खेटे मारावे लागतात. आपणास अपेक्षित असणारे दाखले विहित नमुन्यातील कागदपत्रे दिल्यावर आम्हाकडून अगदी वेळेत दिले जातील. त्यासंबंधी अपेक्षित अधिकाऱ्याकडे तुम्ही पाठपुरावा करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रम आज तरुणाईसाठी सुरू असून त्याचा लाभ तरुणांनी घ्यावा. भारताच्या सशक्त आणि सजग लोकशाहीसाठी ज्यांची मतदार नाव नोंदणी झाली नाही त्यांनी ती आम्ही दिलेल्या नमुन्यातील कागदपत्रे भरून देऊन पूर्ण करून घ्यावी. महसूल विभाग हा अविरत काम करणारा विभाग असून तरुणाईने महसूल विभागाच्या योजनांचा लाभ घेऊन त्या समाजापर्यंत पोहोचवण्याची गरज", असल्याचे प्रतिपादन राजापूरच्या निवडणूक नायब तहसीलदार सौ. शेळके यांनी केले. त्या श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयात डी.एल.एल.ई. विभाग व महसूल विभाग राजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'युवा संवाद' कार्यक्रमात बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. ए. येल्लुरे , डी.एल. एल.ई .विभाग प्रमुख डॉ.ए.डी.पाटील, पाचलचे मंडळ अधिकारी श्री.संजय पवार, तळवडेच्या मंडळ अधिकारी पूनम गावित, परुळेचे तलाठी श्री.सतीश शिंदे, पाचल तलाठी श्री.सचिन पाटील, केळवलीचे तलाठी श्री.विनोद गुरव, उपळेचे तलाठी श्री.अक्षय बिन्नावाले,तळवडेचे तलाठी श्री.रोहन कुंभार आदी मान्यवर होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ए डी पाटील यांनी तर आभार प्रा.एम.डी. देवरुखकर यांनी मानले.

## खापणे महाविद्यालयात बरसल्या काव्याच्या 'श्रावणधारा '

येथील श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयात 'मराठी भाषा व वाङमय मंडळ ' आयोजित 'श्रावणधारा' हा स्वरचित काव्य वाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तदनंतर विद्यार्थ्यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. पाऊस आणि मानव यांचे असणारे नाते, पावसाची सहारक आणि मारक रूपे, पाऊस आणि प्रेम अशी पावसाची विविध रूपे या कवितेतून व्यक्त होत होती. यावेळी प्राची पडवळ , ज्योती कांबळे , स्वाती सुर्वे ,संतोष सावंत, प्रवीण पाटेकर, दीक्षा गांगण, समीक्षा पांचाळ, अमेय सावंत, सज्ञानी घागरे, कलिका जाधव, साहिल नॉर्वेकर, वैष्णवी वरेकर, सारिका गुरव, यश धावडे, सायराबानू काझी, आरसीन गडकरी आदी विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर केल्या. यावेळी प्रा. एस. व्ही. निंबाळकर, डॉ. बी. टी. दाभाडे, प्रा. एस. एस.धोंगडे आदी प्राध्यापकांनी आपल्या कविता सादर केल्या .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'मराठी भाषा व वाङमय मंडळ' प्रमुख डॉ. व्ही.एस.पाटील यांनी केले तर आभार डॉ. बी. टी. दाभाडे यांनी मानले.

### “विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून स्वतःला सिद्ध करावे" - श्री.नरेश पाचलकर



" महाविद्यालयीन जीवन हा विद्यार्थ्यांच्या घडणीचा पाया असतो. विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रात संधी खुणावत असतात. अशा संधीचे सोने करून विद्यार्थ्यांनी जिद्दीने स्वावलंबी बनण्यासाठी अविरत कष्ट घेतले पाहिजेत. त्यासाठी सतत अभ्यास केला पाहिजे. त्यातून उपलब्ध होणाऱ्या संधीचे सोने करून विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करावे, "असे आवाहन संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित ' स्वागत समारंभ' कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे , माजी सरचिटणीस व संस्था सदस्य श्री. चंद्रकांत लिंगायत, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दाभाडे व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तदनंतर यश धावडे याने आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. प्रथम वर्ष कला आणि वाणिज्यच्या विद्यार्थ्यांचे स्वागत द्वितीय व तृतीय वर्ष कला आणि वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी त्यांना भेटवस्तू व फुल देऊन मान्यवरांच्या हस्ते केले. यावेळी संस्थेचे माजी सरचिटणीस व विद्यमान सदस्य श्री. चंद्रकांत लिंगायत व स्वाती सुर्वे,सायरा काजी,कलिका जाधव, साहिल नॉर्वेकर, गौरव नेवरेकर,प्रीतम ढवळे, बन्सी मालप,तुषार गोरुले,नेत्रा बावकर, आकांक्षा चव्हाण आदी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची पडवळ हिने तर आभार सायरा काझीने मानले.

## "स्वयंप्रेरणेने केलेली स्वच्छता ही खूप मोठी देशसेवा आहे " सरपंच श्री.बाबालाल फरास



" स्वच्छतेच्या बाबतीत आपण दिवसेंदिवस अधिकच निष्काळजीपणाने वागत आहोत. प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून बेजबाबदारपणे हे प्लास्टिक वापरानंतर आपण तिथेच फेकून देतो. त्यामुळे बाजारपेठा आणि सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणात खच पडत आहे. खापणे महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग या प्लास्टिक विरोधी जनजागृती आणि स्वच्छता करत आहे.आपण ही निष्काळजीपणा आणि बेजबाबदारपणा बाजूला ठेवून ' मी कचरा करणार नाही ' असे ब्रीद घेऊन स्वयंप्रेरणेने स्वच्छता करूया. स्वयंप्रेरणेने केलेली स्वच्छता ही खूप मोठी देशसेवा असून आपण सर्वांनी त्यासाठी पुढे येऊया ", असे आवाहन पाचलचे सरपंच श्री. बाबालाल फरास यांनी केले. ते श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने ' स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत आयोजित केलेल्या स्वच्छता उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी संस्थेचे सरचिटणीस श्री.नरेश पाचलकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम ए येल्लुरे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विकास पाटील, प्रा.कु.मुग्धा देवरुखकर, डॉ. ए.डी. पाटील,प्रा. पी.पी. राठोड, प्रा. कु. एस.जी.चव्हाण, डॉ.एम. आर. कोंडागुर्ले आदी मान्यवर उपस्थित होते. तदनंतर श्रीफळ वाढवून सरपंच श्री.बाबालाल फरास यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. तदनंतर विद्यार्थ्यांनी जवळेथर तिट्टा परिसर व स्वातंत्र्य सैनिकांचे स्मृतिस्थळ परिसर स्वच्छ केला . पाचल बाजारपेठ परिसर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, पाचल ग्रामपंचायत परिसर स्वच्छ केला. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतच्या दोन गाड्या प्लास्टिक कचरा गोळा केला . त्याबरोबरच दहा गोण्याहून अधिक प्लास्टिक बॉटल जमा करून भंगारात दिल्या.

## आजच्या पिढीला पुढे घेऊन जाणारी ग्रंथालये हीच खरीखुरी ज्ञान भांडारे आहेत " - डॉ. ए. डी. पाटील



" आजची पिढी ही मोबाईल मध्ये गुंतली आहे. या पिढीला आपले खरेखुरे आयडॉल माहीतच नाहीत. डॉ. अब्दुल कलामांसारखे व्यक्तिमत्त्व हेच या पिढीसमोरचे मार्गदर्शक आहेत . त्यांचे चरित्र अभ्यासण्यासाठी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाकडे वळले पाहिजे. डॉ. अब्दुल कलामांचा जन्मदिवस वाचन चळवळ वृद्धिंगत व्हावी म्हणून वाचन प्रेरणा दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो.आजच्या पिढीला पुढे घेऊन जाणारी ग्रंथालये हीच खरीखुरी ज्ञान भांडारे असून विद्यार्थ्यांनी आपले वाचन वाढवून अब्दुल कलामांचा जन्मदिवस खऱ्या अर्थाने साजरा करावा "असे आवाहन ग्रंथालय विभागप्रमुख डॉ.ए. डी. पाटील यांनी केले. ते श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन ' कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एम. ए. येल्लुरे, ग्रंथपाल डॉ.मनोहर कोंडागुर्ले, सौ. स्नेहा कोलते आदी मान्यवर होते. यावेळी ग्रंथालय विभागाने ग्रंथालयातील अतिशय दुर्मिळ अशा ग्रंथांचे प्रदर्शन मांडले होते त्याचे उद्घाटन फित कापून प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ग्रंथपाल डॉ.एम. ए. कोंडागुर्ले यांनी केले.

## " सदृढ लोकशाहीसाठी मतदानाचा टक्का वाढवूया " डॉ. विकास पाटील




" मतदान हे सर्वश्रेष्ठ दान असून ते देणाऱ्याने मोकळ्या मनाने आणि विचारांती द्यावे. देशाचे,राज्याचे भवितव्य घडवणाऱ्या आणि आपल्या नागरिकांचा विकास साधणाऱ्या निष्कलंक, चारित्र्यवान, समाजसेवी लोकप्रतिनिधींना निवडून देण्याची गरज आहे. पण दुर्दैवाने मतदानाचा टक्का दिवसेंदिवस घसरत आहे. आज घराघरापर्यंत आपण जाऊन मतदारांना मतदान करण्यासाठी जागृत करूया.हा घसरणारा टक्का वाढवण्यासाठी आणि देशाच्या लोकशाहीला सदृढ व बळकट बनवण्यासाठी मतदानाचा टक्का वाढवूया " असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास पाटील यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित मतदार जनजागृती कार्यक्रमात 'चला मतदार जागृती करूया' या विषयावर बोलत होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम ए.येल्लुरे हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. एस. व्ही. निंबाळकर,प्रा.एम.डी. देवरुखकरआदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. एम.डी.देवरुखकर यांनी या कालावधीत घ्यावयाच्या जनजागृतीपर उपक्रम, पथनाट्य, रॅली,निबंध स्पर्धा यासंदर्भात माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार यश धावडे याने मानले.

## तरुणाईला करिअरच्या सर्वाधिक संधी " चेतन गोडबोले

"आर्ट्स, सायन्स, कॉमर्स अशा विविध विभागातून आपण पदवीचे शिक्षण पूर्ण करतो पण आपले नेमके ध्येय आपण ठरवत नाही. करिअरच्या सर्वाधिक संधी कॉमर्स विभागातून आहेत. पण त्याविषयीचे अधिक ज्ञान आपण घेत नाही. निलया एज्युकेशन फाउंडेशन ग्रामीण भागातील मुलांना या विविध संधी त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम करते. ग्रामीण भागातील मुलातील जिद्द, चिकाटी आणि कष्ट करण्याची तयारी पाहता या तरुणाईला करिअरच्या सर्वाधिक संधी आहेत. त्यासाठी तरुणाईने पुढे यावे, " असे आवाहन निलया फाउंडेशनचे प्रा. चेतन गोडबोले यांनी केले. ते श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा विभाग आणि निलया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात 'करिअर गाईडन्स' या विषयावर बोलत होते.यावेळी व्यासपीठावर स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख डॉ. ए. डी. पाटील होते.

## "तंदुरुस्त आरोग्य हीच खरी धनसंपदा" जगदीश पाटील

" कोरोना नंतरचा कालखंड हा गुंतागुंतीचा आणि धावपळीचा बनत चालला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असणारी विविध युद्धे, त्यातून मानवी हस्तक्षेपामुळे ढासळत चाललेला पर्यावरणाचा समतोल आणि मानवी व नैसर्गिक प्रदूषण, आपत्तीमुळे मानवी आरोग्याचे प्रश्न गंभीर बनत चालले आहेत. अशा काळात तंदुरुस्त आरोग्य हीच खरी धनसंपदा असून तरुणाईने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, " असे आवाहन ग्रामीण रुग्णालय रायपाटणचे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी जगदीश पाटील यांनी केले. ते श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात महिला विकास कक्ष आयोजित रक्तगट व हिमोग्लोबिन चेकिंग कॅम्प उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी एस मेश्राम, समुदाय आरोग्य अधिकारी समृद्धी जाधव, फ्लेबॉट्रोमिस्ट स्वप्नाली जाधव, आरोग्य सेविका संपदा किनरे, आरोग्य सेवक एस. एस. झोरे, महिला विकास कक्ष सदस्या प्रा. एस. जी. चव्हाण, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.बी.टी. दाभाडे, प्रा. एस. एस. धोंगडे आदी मान्यवर होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून प्रा. एस. जी. चव्हाण यांनी हिमोग्लोबिन आणि रक्तगट चेकिंग चे महत्व विशद केले

## "निवासी शिबिरातील अनुभवांची शिदोरी समाजापर्यंत घेऊन जा" श्री. नरेश पाचलकर

"आज संस्काराची शिबिरे हरवत चालली आहेत. अशा काळात विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिर खूप मोठे काम करताना दिसते. या शिबिरात विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व समजते. समाजातील प्रश्नांची जाण होते. संवाद हरवत चाललेल्या काळात स्वयंसेवक एकत्र राहतात आणि सुसंवाद वाढतो. या शिबिरात तुम्ही केलेल्या ऐतिहासिक शिवकालीन पायवाटेच्या दुरुस्तीची आणि उगवाई मंदिर जीर्णोद्धाराची सोशल मीडियावर प्रसिद्धी केलात तर येणाऱ्या काळात ही दोन्ही कामे होऊन जातील. पर्यटनाला चालना मिळेल. म्हणूनच या शिबिरातून संस्काराबरोबरच मिळणारी अनुभवाची शिदोरी समाजापर्यंत घेऊन जा ",असे आवाहन सह्याद्री परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस श्री.नरेश पाचलकर यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या येरडव येथील विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या निरोप समारंभ कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम, येरडव ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष आणि पत्रकार श्री.उमेश दळवी, श्री अशोक दळवी, श्री मधुकर दळवी, श्री सुनील शेलार,प्रा.संजय निंबाळकर, प्रा. बळवंत दाभाडे,प्रा.पवन राठोड, प्रा. स्नेहल चव्हाण, प्रा.सुभाष धोंगडे, ग्रंथपाल डॉ. मनोहर कोंडागुर्ले,कार्यक्रम अधिकारी डॉ. विकास पाटील, प्रा. मुग्धा देवरुखकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून येरडव मुक्कामी केलेल्या चार बंधारे बांधणे, शोषखड्डे खुदाई, दोन पिकअप शेड स्वच्छता, दत्त मंदिर , हनुमान मंदिर तसेच उगवाई मंदिर स्वच्छता व ऐतिहासिक शिवकालीन पायवाटेची पुनर्बांधणी, बौद्धिक क्षेत्रातील व्याख्याने आणि सर्वेक्षण आदी उपक्रमांची माहिती दिली. तदनंतर कु.स्वाती सुर्वे, कु.दीक्षा गांगण या स्वयंसेविकांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी सात दिवसांच्या शिबिरातील आपल्या अनुभव लेखनातून शब्दबद्ध केलेल्या 'स्नेहबंध' या हस्तलिखिताचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तदनंतर विद्यार्थ्यांनी सात दिवस केलेल्या गटानुसार कार्यासाठी त्यांना बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यामध्ये शिस्तप्रिय ग्रुप म्हणून ग्रुप क्रमांक पाच, बेस्ट श्रमदान ग्रुप म्हणून ग्रुप क्रमांक तीन, बेस्ट भोजन ग्रुप म्हणून ग्रुप क्रमांक चार, बेस्ट सांस्कृतिक ग्रुप म्हणून ग्रुप क्रमांक दोन, तर सर्वोत्कृष्ट ग्रुप म्हणून ग्रुप क्रमांक एकला गौरवण्यात आले. या शिबिरातील आदर्श स्वयंसेवक म्हणून भरत गोरुले याला तर आदर्श स्वयंसेविका म्हणून कु.ऋतुजा पांचाळ आणि बेस्ट डायरी लेखिका म्हणून कु.निसर्गात धावडे या सर्वांना सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. तदनंतर प्रा. संजय निंबाळकर, श्री. उमेश दळवी, प्रभारी प्राचार्य डॉ.पी. एस. मेश्राम आदी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व येरडव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विकास पाटील यांनी तर आभार प्रा.मुग्धा देवरुखकर यांनी मानले.

## "क्रीडा स्पर्धेत आपल्यातला खेळाडू शोधून करिअर उज्वल करा " श्री नरेश पाचलकर



" आज विद्यार्थी मैदानावर कमी आणि मोबाईल मध्ये जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विद्यार्थी मैदानावरील खेळापेक्षा मोबाईलवरील गेममध्येच रमतो आहे. आज प्रो कबड्डीसारख्या खेळात आपल्याच मातीतील खेळाडू निवडले जात आहेत. उत्तम करिअरसाठी विद्यार्थ्यांनी खेळाकडे पाहिले पाहिजे. कबड्डी, हॉलीबॉल, कॅरम,बुद्धिबळ, रनिंग अशा सांघिक व वैयक्तिक खेळात प्राविण्य मिळवून तुम्ही स्वतःबरोबरच तुमचे होस्टेल,शाळा, तालुका, जिल्ह्याचे नाव रोशन करा.क्रीडा स्पर्धेत आपल्यातला खेळाडू शोधून करिअर उज्वल करा."असे आवाहन सह्याद्री परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर यांनी केले. ते श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या प्रांगणात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग रत्नागिरीद्वारा आयोजित ' शासकीय मुला-मुलींच्या वस्तीगृहातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी जिल्हास्तरीय क्रीडा व कला / सांस्कृतिक महोत्सव सन 2024 - 25 ' च्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रत्नागिरीचे श्री.दीपक घाटे अध्यक्षस्थानी होते.यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी. एस. मेश्राम, हेरिटेज कल्चर रत्नागिरीचे सदस्य श्री. संतोष कांबळे, समाज कल्याण रत्नागिरीच्या लेखाधिकारी सौ. दिपाली केळकर, समाज कल्याण रत्नागिरीच्या ओ. एस.सौ. विजया मोरे , समाजकल्याण रत्नागिरीचे निरीक्षक श्री.प्रताप कांबळे, सरस्वती विद्यामंदिर पाचलचे क्रीडा शिक्षक श्री. नितीन सांडम, आपने महाविद्यालयाचे श्री.राजेश चव्हाण, आदी मान्यवर होते. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री नरेश पाचलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आले. तदनंतर विद्यार्थ्यांनी आपल्या संचलनातून ध्वजाला व मान्यवरांना मानवंदना दिली. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी.एस. मेश्राम यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेची ज्योत प्रज्वलित करण्यात आली. मान्यवरांना कॅप भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

## तरुणाईने 'रस्ता सुरक्षा अभियान' घराघरापर्यंत पोहोचवावे - राजश्री पाटील



" आज अपघाताची संख्या प्रचंड वाढली आहे. बेफिकिरी आणि बेदरकारपणे गाडी चालवल्याने चालकाबरोबरच निरापराध्यांचाही जीव जात आहे. लहानशा चुकांमुळे अनेकांचे जीव जात आहेत. हे सर्व टाळण्यासाठी आपण रस्ता सुरक्षेचे नियम पाळले पाहिजेत. परिवहन विभागाने दिलेली आचारसंहिता आपण सर्वांनी अंमलात आणली पाहिजे. 'रस्ता सुरक्षा अभियान' हे रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी असून हे अभियान तरुणाईने घराघरापर्यंत पोहोचवावे, " असे आवाहन रत्नागिरीच्या सीनियर परिवहन अधिकारी राजश्री पाटील यांनी केले. त्या श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात महिला विकास कक्ष, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय रत्नागिरी आणि श्री.साई मोटार ट्रेनिंग स्कूल,पाचल यांच्या संयुक्त विद्यमाने 'रस्ता सुरक्षा अभियान ' कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी.एस. मेश्राम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, रत्नागिरीच्या परिवहन अधिकारी देसाई मॅडम, मोटर वाहन निरीक्षक श्री.धैर्यशील लोंढे, श्री. प्रदीप राठोड, साई मोटर ट्रेनिंग स्कूलच्या अध्यक्षा श्रीमती पुजा शिगम, महिला विकास कक्ष विभागाच्या प्रा.एस. जी.चव्हाण, प्रा. एम. डी. देवरुखकर, प्रा.एस.एस. धोंगडे आदी मान्यवर होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते एकोणीस हेल्मेटचे वाटप मुलांना करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस. जी.चव्हाण यांनी तर आभार प्रा.एम.डी. देवरुखकर यांनी मांडले.


## खापणे महाविद्यालयात शेकोटीच्या उबित रंगली थंडीवरील कवितेची काव्य मैफील



श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात मराठी भाषा व वाङ्मय मंडळाने 'मराठी भाषा पंधरवड्या निमित्त' आयोजित केलेल्या शेकोटी काव्य संमेलनात विद्यार्थ्यांनी आपल्या थंडीवरच्या कविता सादर केल्या. समोर पेटवलेली शेकोटी आणि शेकोटीच्या उबीत शब्दातून थंडी व्यक्त करणारे विद्यार्थी असे विलोभनीय दृश्य होते.

यावेळी सुजानी पांचाळ ,आरसीन गडकरी, सायरा काझी, प्राची पडवळ, ऋतुजा पांचाळ, सायली गुरव, सिद्धेश गोसावी,निसर्गा धावडे,दीक्षा गांगण, अमेय सावंत,प्राजक्ता बेर्डे, साहिल नॉर्वेकर,स्वाती सुर्वे,कलिका जाधव, सज्ञानी घागरे आदी विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विकास पाटील यांनी तर आभार डॉ.बळवंत दाभाडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "पुस्तक वाचनाने माणूस घडतो" डॉ. पी. एस. मेश्राम



" आज वाचन संस्कृती लोक पावत चालली असून अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ ग्रंथालयात धुळखात पडले आहेत. महाराष्ट्रातील विचारवंतांच्या जडणघडणीत या ग्रंथाचे अनन्यसाधारण महत्त्व होते. ग्रंथालय चळवळीने पुन्हा एकदा उभारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे म्हणूनच शासनाला 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' सारखे कार्यक्रम घ्यावे लागतात. ही वाचन संस्कृती वाचन पंधरवड्या इतकीच मर्यादित न राहता ती वाढवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करूया. पुस्तक वाचनानेच माणूस घडतो त्यामुळे सर्वांनी वाचनाकडे वळूया.वाचन संस्कृती वृद्धिंगत करूया, " असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ.पी.एस. मेश्राम यांनी केले. ते श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयात ग्रंथालय विभाग आयोजित 'वाचन पंधरवडा' कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.ए.डी. पाटील,प्रा. एन. जी. देवन, डॉ. व्ही. एस. पाटील, ग्रंथपाल डॉ.एम. आर. कोंडागुर्ले आदी मान्यवर होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून डॉ. ए. डी.पाटील यांनी वाचन पंधरवड्याचे औचित्य प्रकट करून या पंधरवड्यात ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन, मार्गदर्शकपर व्याख्यान, पुस्तक परीक्षण, गटचर्चा आदी घ्यावयाच्या उपक्रमा संदर्भात माहिती दिली. याबरोबरच महाविद्यालयात रोज दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन लावण्यात येणार असून ते विद्यार्थ्यांनी रोज पाहावे असेही सूचित केले . या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ए.डी. पाटील यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ. एम. आर.कोंडागुर्ले यांनी मांडले.

## "समस्यांना संधी मानून काम करण्याची प्रेरणा डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून मिळते " प्रा. स्नेहल चव्हाण

" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक क्षेत्रात भरीव काम केले आहे. प्रखर बुद्धिमत्तेच्या बळावर त्यांनी अनेक भाषेवर प्रभुत्व मिळवले. 'तुम्ही आम्हासारखे लोकपरंपरेचे राजे नाही, तर ज्ञानाचे राजे आहात' असा सन्मान शाहू महाराजांनी त्यांना दिला. कोलंबिया विद्यापीठाने त्यांच्या विद्वत्तेची दखल घेतली आहे. प्रत्येक क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी खूप मोठे काम केले. संविधानातून भारताला बळकट लोकशाही दिलीच, त्याबरोबरच सर्वांना समान अधिकारही दिलेत. समाजातल्या सर्व मागास घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र सर्वांनाच प्रेरणादायी आहे.समस्यांना संधी मानून काम करण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून मिळते. त्यांचे विचार आत्मसात करून नवभारत घडवूया, " असे आवाहन प्रा. स्नेहल चव्हाण यांनी केले. त्या श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन' कार्यक्रमात ' डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार ' या विषयावर बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर ग्रंथपाल डॉ. एम. आर. कोंडागुर्ले, प्रा.पी.पी.राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

## "एड्स संदर्भातील जनजागृतीत एन एस एस स्वयंसेवकाची खूप मोठी भूमिका " डॉ. विकास पाटील

" एड्स संदर्भात खूप मोठी जनजागृतीची चळवळ झाली. एड्स आजार होणे म्हणजे तो रुग्ण पापी आहे ही समाजाची भूमिका बदलत गेली. अशा रुग्णांना आज शासकीय पातळीवर मदत व उपचार उपलब्ध आहेत. या उपचारातून या रुग्णांचे आयुर्मान वाढते आहे. रुग्णांची गोपनीयता पाळली जाते. या रुग्णांकडे पाहण्याची समाजाची बदललेली भूमिका व्यापक जनजागृतीमुळे बदलली आहे.या एड्स संदर्भातील जनजागृतीत एन. एस.एस. स्वयंसेवकाची खूप मोठी भूमिका असून ती यापुढेही रोगाचा नायनाट होईपर्यंत चालू ठेवूया," असे आवाहन डॉ. विकास पाटील यांनी केले ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित एड्स सप्ताह अंतर्गत ' एड्स आजार आणि उपचार ' या विषयावर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. डी. देवरुखकर, प्रा. एस. जी. चव्हाण आदी मान्यवर होते. प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून प्रा. एम. डी. देवरुखकर यांनी कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. या सप्ताह अंतर्गत रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, गटचर्चा, जनजागृतीपर पत्रक वाटप, व्याख्यान अशा घ्यावयाच्या विविध कार्यक्रमासंबंधी माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. एम. डी.देवरुखकर यांनी मांडले.

## "संविधान हा बलशाली भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे " प्रा.पवन राठोड

" भारतीय लोकशाही ही जगातली मोठी आणि आदर्शवत अशी लोकशाही मानली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारशृंखलेतून निर्माण झालेले संविधान हे या लोकशाहीच्या केंद्रस्थानी आहे. सर्वसामान्य मतदारही देशाच्या सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचू शकतो असे हक्क आणि अधिकार देऊन त्याच्या कर्तव्याची जाणीव ही संविधान करून देते. संविधान हा बलशाली भारतीय लोकशाहीचा आत्मा असून हे संविधान घराघरापर्यंत नेण्याचा संकल्प आज संविधान दिनी करूया ", असे आवाहन प्रा.पवन राठोड यांनी केले. ते श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित संविधान दिन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. पी. एस. मेश्राम, डॉ.ए.डी.पाटील, प्रा.एस. व्ही.निंबाळकर, डॉ. व्ही.एस. पाटील,प्रा. एन. जी. देवन, प्रा. एस. एस. धोंगडे, प्रा.एम.डी. देवरुखकर, प्रा. एस.जी. चव्हाण, ग्रंथपाल डॉ.एम. आर.कोंडागुर्ले, सौ. एस. व्ही. कोलते आदी मान्यवर उपस्थित होते.

## "शिक्षणाला डिजिटायझेशनची जोड देऊन तुमचे करिअर यशस्वी करा " सिया शेरे

" आजचे युग तंत्रज्ञानाचे असून पारंपरिक शिक्षणाबरोबरच आपण आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. आज सर्वच क्षेत्रातील काम सुलभ होण्यासाठी वेगवेगळे ॲप्स व टूल उपलब्ध आहेत. या साऱ्यांचा योग्य प्रकारे वापर करता आल्यास तुम्ही अधिक गतिमान होता. म्हणून पारंपरिक शिक्षण घेऊन त्याला डिजिटायझेशनची जोड देऊन तुमचे करिअर यशस्वी करा ", असे आवाहन सिया शेरे यांनी केले. त्या श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात आय क्यू एसी विभाग व एमकेसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत ' युज ऑफ ए आय टूल्स अँड करियर गायडन्स ' बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर आय क्यू एसी विभाग प्रमुख प्रा.एस. व्ही. निंबाळकर, आयटी कोऑर्डिनेटर प्रा. एन. जी. देवन आदी मान्यवर होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून प्रा.एस. व्ही. निंबाळकर यांनी कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. या कार्यशाळेत विविध प्रात्यक्षिकांसह ए आय चा वापर कसा करावा या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.एस. व्ही. निंबाळकर यांनी मांडले.

## "समाजाच्या जडण घडनीत शिक्षकाची भूमिका महत्त्वाची " - प्रा.स्नेहल चव्हाण

" आज समाजात घडणाऱ्या घटना पाहिल्या की मनाला वेदना होतात. समाजाचे स्वास्थ्य सांभाळण्याचे काम शिक्षकांच्या संस्कारातूनच होत असते. शिक्षक हा समाजाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक असून आई-वडील आणि कुटुंबाबरोबर विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकाचाही खूप मोठा वाटा असतो. आज भ्रष्टाचारापासून मुक्त असणारा घटक आणि समाजाला ज्ञान देणारा घटक शिक्षक असून अशा शिक्षकांचा सर्वांनीच आदर ठेवला पाहिजे. समाजाच्या जडणघडणीत शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असून समाजानेही शिक्षकांचा सन्मान ठेवावा." असे आवाहन प्रा. स्नेहल चव्हाण यांनी केले. त्या श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण जयंती शिक्षक दिन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बी.टी. दाभाडे, प्रा. पी. पी.राठोड, डॉ. ए.डी.पाटील, डॉ.पी.एस.मेश्राम, प्रा. एस. व्ही. निंबाळकर, प्रा. एन. जी. देवन, प्रा. एस.एस. धोंगडे, प्रा.एम. डी. देवरुखकर, ग्रंथपाल डॉ.एम. आर. कोंडागुर्ले, सौ स्नेहा कोलते आदी मान्यवर होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बी.टी. दाभाडे यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. यावेळी डॉ.पी. एस. मेश्राम यांची प्रोफेसरपदी व डॉ.ए.डी.पाटील, डॉ.व्ही. एस. पाटील यांची स्टेज दोन मधून तीन मध्ये पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सुमित सावंत, अमेय सावंत,साहिल नार्वेकर सायरा काजी आर्सीन गडकरी आदी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ऋतुजा पांचाळ हिने तर आभार यश धावडे यांने मांडले.

## 'हर घर तिरंगा' हा उपक्रम घराघरात पोहोचवून तो लोकोत्सव करूया " श्री.सिताराम पवार

"स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही देशभक्तीची भावना प्रबळ राहावी आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या विचारांचा जागर व्हावा म्हणून 'हर घर तिरंगा' हा उपक्रम शासनाने हाती घेतला आहे . शासनाने सुरू केलेला हा उपक्रम वेगवेगळ्या माध्यमातून लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे.आपण सर्वजण 'हर घर तिरंगा' हा उपक्रम घराघरात पोहोचवून तो लोकोत्सव म्हणून साजरा करूया ", असे आवाहन पाचल येथील माजी सैनिक श्री.सिताराम पवार यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित माजी सैनिक सत्कार समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए. येल्लुरे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ. व्ही.एस. पाटील, प्रा. एम. डी. देवरुखकर, डी. एल. एल. ई. चे विभाग प्रमुख डॉ. ए. डी. पाटील, प्रा.एस.एस. धोंगडे आदी मान्यवर होते.महाविद्यालयात दि.13 ऑगस्ट ते दि.15 ऑगस्ट 2024 या कालावधीत ' हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. दि. 13 ऑगस्ट रोजी हरळ ते सह्याद्री दर्शन अशी तिरंगा रॅली काढण्यात झाली. तर आज माजी सैनिक श्री सिताराम पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. तदनंतर विद्यार्थ्यांनी तिरंगा शपथ घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.व्ही. एस. पाटील यांनी केले तर आभार प्रा. एम. डी. देवरुखकर यांनी मानले.

## "संस्कार आणि विचारांचे बळ देण्याचे सामर्थ्य पुस्तकातच " प्रा. एस. व्ही. निंबाळकर

" आज वाचन संस्कृती वाचवण्याची गरज असून त्यासाठी तरुणाईने पुढे येण्याची गरज आहे. एक काळ मौखिक परंपरेने शिक्षण दिले जात होते. त्यामुळे सारे ज्ञान मौखिक परंपरेने जपले जात होते. नंतर वाचन संस्कृती अस्तित्वात आली. पुस्तक आणि ग्रंथालयांची संख्या वाढली. त्या प्रमाणातच वाचनाकडे लोकांचा कल वाढला आणि लोक ग्रंथालयाकडे वळू लागले. आज या वाचकांची संख्या रोडावली असून ग्रंथालय ओस पडत आहेत. साहित्यिकांनी आपल्या प्रतिभेच्याबळावर निर्माण केलेले साहित्य धुळखात पडले आहे. आज ग्रंथालयामध्ये न जाता ई मीडियावरही अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. संस्कार आणि विचारांचे बळ देण्याचे सामर्थ्य पुस्तकातच असून अशा पुस्तकांचे वाचन करून वाचन संस्कृती आपण जपूया, " असे आवाहन प्रा. एस.व्ही. निंबाळकर यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात ग्रंथालय विभाग आयोजित डॉ.एस. आर. रंगनाथन जयंती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ.ए.डी. पाटील, ग्रंथपाल डॉ. एम.आर. कोंडागुर्ले, सौ. स्नेहा कोलते आदी मान्यवर होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून व डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाली. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून डॉ. ए.डी.पाटील यांनी कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागामार्फत गोल्डकार्ड देण्यात येते. गोल्डकार्ड असणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचनासाठी अधिकचे एक पुस्तक दिले जाते. त्या अंतर्गत समीक्षा पांचाळ, सायराबानू काझी, कलिका जाधव,सज्ञानी घागरे, यश धावडे, अमित पवार, ज्योती कांबळे आदी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गोल्ड कार्ड देण्यात आले. यावेळी ग्रंथालयातील दुर्मिळ पुस्तकांचे पुस्तक प्रदर्शन विभागाच्या वतीने मांडण्यात आले होते त्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ.एम.ए.येल्लुरे यांच्या हस्ते झाले. शेवटी आभार सौ. स्नेहा कोलते यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ.एम. आर. कोंडागुर्ले यांनी केले.

## "ज्येष्ठांशी हितगुज सारखे कार्यक्रम होण्याची समाजाला गरज " विनोद करंदीकर

" समाजात आज तरुणाईचा ज्येष्ठांशी संवाद हरवत चालला आहे. आपल्या अनुभवाचे बोल पुढच्या पिढीला मिळावेत म्हणून आपल्या घरातील जेष्ठांची धडपड सुरू असते. आपण मात्र याकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष करतो. प्रभाकर पळसुलेदेसाईसारखी माणसे म्हणजे ऐंशीहून अधिक वर्षाचीअनुभवाची चालती बोलती विद्यापीठे आहेत. आजही ते आपल्या गावातील शाळा, महाविद्यालयात शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या उत्पन्नातील ठराविक भाग त्यांच्या खाऊसाठी द्यावा म्हणून धडपडतात. त्यांच्यासारख्या दातृत्वाची समाजाला गरज असून आजच्या पिढीने या ज्येष्ठ पिढीसी सुसंवाद साधून आपले जीवन सुसह्य करावे " असे आवाहन जिजामाता हायस्कूल रायपाटणचे माजी मुख्याध्यापक श्री.विनोद करंदीकर यांनी केले. ते श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित 'ज्येष्ठाशी हितगुज आणि प्रभाकर प्रभूदेसाई यांचे खाऊवाट ' अशा संयुक्त कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए.येल्लुरे, रायपाटण गावचे माजी सरपंच आणि तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्री. प्रभाकर प्रभुदेसाई, श्री.रामचंद्र कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.विकास पाटील, प्रा.मुग्धा देवरुखकर आदी मान्यवर होते.

## "वसुंधरेच्या संवर्धनासाठी वृक्षारोपणाची गरज" साहिल घाग

" वाढत्या वृक्षतोडीचे दुष्परिणाम आज आपणास दिसत आहेत. वाढलेले तापमान आणि त्यामुळे बर्फ वितळून हिमनद्या आणि सागराच्या पातळीत चिंताजनक वाढ होत आहे. वृक्षतोडीमुळे पावसाळ्यात जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होते. कडे, डोंगर कोसळून गावेच्या गावे जमिनीखाली गाडली जात आहेत. मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि जीवित हानी होत आहे. अशावेळी सर्वांनी वृक्षारोपण हाच उपाय आहे. वसुंधरेच्या संवर्धनासाठी वृक्षारोपणाची गरज असून आपण सर्वांनीच लावलेल्या रोपांची काळजी घेऊया, " असे आवाहन टीडब्ल्यू जे ट्रेडविजाझचे असिस्टंट मॅनेजर श्री. साहिल घाग यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व टी डब्ल्यू जे ट्रेडविजाझ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए. येल्लुरे,टी डब्ल्यू जे ट्रेडविजाझचे रिलेशनशिप मॅनेजर ऋषिकेश कदम, कृणाल चव्हाण, ओमकार धामणे, सुजल होळम,अथर्व धामणस्कर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. व्ही.एस. पाटील, प्रा. एम. डी. देवरुखकर, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते. शेवटी आभार प्रा.एम.डी. देवरुखकर यांनी मानले.

## खापणे महाविद्यालयात क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न



## " एक ऑगस्ट एका युगप्रवाचा अस्त आणि नव्या युगप्रवाचा उदय दिन " प्रा.एस. एस. धोंगडे

"१ ऑगस्ट या दिनाला अत्यंत महत्त्व असून हा दिवस भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे लढवये नेतृत्व व जहाल मतवादाचे पुरस्कर्ते लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अग्रणी नेतृत्व आणि साहित्यसम्राट म्हणून ओळख असणाऱ्या अण्णाभाऊ साठेंची जयंती म्हणून ओळखला जातो . लोकमान्य टिळकांनी 'केसरी' आणि 'मराठा' हे वृत्तपत्र सुरू केले. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती सुरू करून स्वातंत्र्य चळवळ सामूहिक करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यलढ्यात दिलेले त्यांचे योगदान अनमोल आहे. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील योगदान खुप मोठे आहे. भारतीय भाषांबरोबर पाश्चात्य भाषेतही त्यांच्या साहित्यकृती अनुवादित झाल्या यावरून त्यांच्या साहित्याची थोरवी समजते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी दिलेले योगदान अनमोल आहे. अशा या महान विचारवंत आणि महात्म्यांचे विचार आपण आत्मसात करूया," असे आवाहन प्रा. एस. एस. धोंगडे यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित 'अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी' कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. ए. येल्लुरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दाभाडे, प्रा. पी.पी.राठोड, प्रा. एम. डी. देवरुखकर आदी मान्यवर होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.पी.राठोड यांनी तर आभार प्रा.एम. डी.देवरुखकर यांनी मानले.

## "आपल्या जनतेचे अश्रू पुसण्यासाठी संस्थानाचा खजिना रिता करणारा शाहू महाराजांसारखा राजा विरळाच" श्रीमती स्नेहल चव्हाण

" जनक राजा आणि विश्वामित्रानंतर राजर्षी हा सन्मान मिळवणारे छत्रपती शाहू महाराज हे खरेखुरे जनतेचे राजे होते. दुष्काळ आणि प्लेगच्या साथीत जनतेचे अश्रू पुसण्यासाठी त्यांनी आपला खजिना रिता केला. आपल्या संस्थानात आरक्षणाचा कायदा लागू करून त्यांनी नवभारताची निर्मिती केली. जातीयतेच्या निर्मूलनासाठी स्वतः कृतीतून प्रयत्न केले.शिक्षण,व्यापार,शेती,साहित्य, कला, औद्योगीकरण, सिंचन अशा सर्वच क्षेत्रात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भरीव कामगिरी करून आपल्या प्रजेचे अश्रू पुसण्यासाठी संस्थानाचा खजिना रिता करणारा शाहू महाराजांसारखा राजा विरळाच असून अशा राजांचे विचार अंगीकृत करूया " असे आवाहन श्रीमती स्नेहल चव्हाण यांनी केले. त्या श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.बी.टी. दाभाडे,प्रा. पी. पी. राठोड आदी मान्यवर होते. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून डॉ.बी.टी. दाभाडे यांनी कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. टी.दाभाडे यांनी केले तर आभार प्रा.पी.पी.राठोड यांनी मांडले

## " धावपळीच्या जीवनात निरोगी आरोग्याची गुरुकिल्ली म्हणजेच योग - - " प्रा. एन. जी. देवन

" योगाला भारतीय संस्कृतीत खूप महत्त्व असून हे महत्त्व आता जगाला पटले आहे.त्यामुळेच जगभरात २०१५ पासून आंतरराष्ट्रीय योग दिन १७७ पेक्षा अधिक देशात उत्साहात साजरा केला जातो. योगाने आरोग्य निरोगी राहते व दिवसभर शारीरिक उत्साह राहतो. घरच्या घरी योग सुलभपणे करता येतात. धावपळीच्या जीवनात निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली म्हणजे योग असून योगाचे हे महत्त्व आता तरुणाईने घराघरापर्यंत पोहोचवावे " असे आवाहन प्रा.एन.जी. देवन यांनी केले. ते श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित 'आंतरराष्ट्रीय योग दिन ' कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. व्ही. एस.पाटील, प्रा. एम. डी. देवरुखकर आदी मान्यवर होते. डॉ. व्ही. एस. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. तदनंतर प्रा. एन. जी. देवन यांनी विविध योगांचे महत्त्व सांगत प्रात्यक्षिक सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.एम.डी देवरुखकर यांनी मानले.

## "मराठीचा शब्दसंग्रह आणि गोडवा जपून मराठीला रोजगाराची भाषा बनवूया " डॉ.विकास पाटील

" आज मराठी भाषेला पर्याय म्हणून इंग्रजी, हिंदी यासारख्या भाषा अधिक वापरल्या जात असल्या तरी मराठी भाषिकांनी मराठीचा शब्द संग्रह जाणून घेतला पाहिजे. एका डोळा या शब्दावरून मराठीत ३० पेक्षा अधिक म्हणी आहेत. पाणी या शब्दावरूनही असेच म्हणींचे वैभव मराठीत दिसते. मराठीच्या या शब्दवैभवामुळेच व तिच्यातील गोडव्यामुळे मराठी भाषा अमराठी भाषिकांनाही आपलीशी वाटते. आज ई मीडियावर मराठीचा मोठ्या प्रमाणात वापर तरुणाईने करणे आवश्यक आहे. संगणकावर अधिकाधिक मराठी भाषा वापरली जावी. शासनाने ही या राजभाषेला रोजगाराची भाषा बनवावी. यापुढे आपण सर्वांनीच मराठीचा शब्दसंग्रह आणि गोडवा जपून मराठीला रोजगाराची भाषा बनवूया " असे आवाहन डॉ. विकास पाटील यांनी केले. ते श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयात 'मराठी भाषा व वाङमय मंडळ 'आयोजित मराठी भाषा पंधरवड्या निमित्त आयोजित 'मराठीचे वैभव आणि स्थिती ' या विषयावर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी.एस. मेश्राम, डॉ. बी. टी. दाभाडे, प्रा. एस. एस. धोंगडे, प्रा. पी.पी. राठोड, प्रा.एम .डी . देवरुखकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तदनंतर आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून डॉ. बी.टी.दाभाडे यांनी मराठी भाषा पंधरवड्या निमित्त घेण्यात आलेल्या शेकोटी काव्य संमेलन, मायबोली भिंती पत्रिका, गटचर्चा, रांगोळी स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, मान्यवरांची व्याख्याने आदी संदर्भात माहिती दिली.

## खापणे महाविद्यालयात अँटी रॅगिंग विभागामार्फत रांगोळी स्पर्धा संपन्न

## महाविद्यालयात हिंदी विभागामार्फत दुर्मिळ हिंदी ग्रंथांचे प्रदर्शन संपन्न

## महाविद्यालयात सांस्कृतिक विभागामार्फत खानाखजाना, पारंपरिक डे, चॉकलेट डे, ब्लॅक अँड व्हाईट डे, रोज डे असे विविध उपक्रम संपन्न झाले.

## ग्रामीण साहित्य संमेलनाच्या क्रांतीज्योतीचे खापणे महाविद्यालयाने केले उत्साहात स्वागत

राजापूर लांजा तालुका नागरिक संघाचे दहावे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन वाटूळ येथे एक व दोन फेब्रुवारी रोजी संपन्न होत आहे. या साहित्य संमेलनाची सुरुवात झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे मूळ गाव लांजा तालुक्यातील कोट येथून क्रांतीज्योत आणून होत असते. ही क्रांतीज्योत या पूर्वी झालेल्या साहित्य संमेलनाच्या ठिकाणी जाऊन सध्या सुरू असलेल्या साहित्य संमेलनाच्या ठिकाणी पोहोचते. त्या अंतर्गतच आज पाचलमध्ये ही क्रांतीज्योत आल्यावर श्री.मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या क्रांतीज्योतीचे उत्साहात स्वागत केले

## खापणे महाविद्यालयात कॉमर्स विभागाने केले मॉडेल प्रदर्शन

येथील श्री मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या कॉमर्स विभागामार्फत कॉमर्स शाखेतील विविध विषयांच्या माहितीदर्शक मॉडेलचे प्रदर्शन संपन्न झाले. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी. एस. मेश्राम यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी कॉमर्स विभागाचे प्रा. पी. पी. राठोड,प्रा. एस.जी. चव्हाण, प्रा.एम.डी. देवरुखकर आदी मान्यवर उपस्थित होते. तदनंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या प्रदर्शनात अधिकृत भांडवलाचे मॉडेल सायरा काझी व आरसीन गडकरी यांनी, ताळेबंदाचे मॉडेल दीक्षा गांगण व प्रसाद धुळप यांनी, संप्रेषणाची साधने हे साहिल नार्वेकर याने, भारतातील करांच्या स्वरूपाची माहिती देणारे मॉडेल जागृती गुरव, इतिशा जाधव, एटीएम मशीनचे प्रदर्शन निसर्गा धावडे हिने, ग्राहकांचे हक्क हे प्रथमेश गिरकर, विक्रांत शिंदे,यश सावंत यांनी, मागणीच्या सिद्धांताचे मॉडेल अमेय सावंत, शुभम गोरूले, सुमित सावंत, पंढरीनाथ वाफेलकर, आयुष मांजरे,प्रतीक वाफेलकर , मागणीची लवचिकता दाखवणारे मॉडेल सिद्धी कस्पले, ऋतुजा पांचाळ,सायली गुरव यांनी बनवले होते. ही सारी मॉडेल कॉमर्स विभागातील सिद्धांतांची अचूक माहिती देणारी होती. विद्यार्थी आपल्या मॉडेल जवळ उभे राहून मॉडेल संदर्भात समग्र माहिती देत होते.

## खापणे महाविद्यालयामार्फत स्कूल कनेक्ट अभियान संपन्न

नव्या शैक्षणिक धोरणाची माहिती देण्यासाठी खापणे महाविद्यालयातील प्राध्यापकांनी कारवली, नेर्ले -तिरवडे, मूर, जवळेथर, मिळंद , ओणी,रिंगणे, कोंडगे,रायपाटण, अनुस्कुरा, येळवण, सौंदळ, वाटुळ, ताम्हाणे, तुळसवडे आदी गावातील हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये जाऊन या संदर्भात माहितीपर व्याख्यान दिले.

## खापणे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

महाविद्यालयात महिला विकास कक्षामार्फत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. एस.जी. चव्हाण यांनी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन व कार्य' या विषयावर अनमोल मार्गदर्शन केले.